# सह्याद्रि सहकारी साखर कारखाना लि, यशवंतनगर,
## ता.कराड, जि. सातारा.

फोन नं. कारखाना- ८९५६०१५५०१ ते ०५, ई-मेल- sahyadrisugar@gmail.com

## :: इथेनॉल वाहतूक निविदा ::

आमच्या कारखान्याच्या इथेनॉल प्रकल्पामध्ये सन २०२४-२५ इथेनॉल वर्षात उत्पादित होणारे इथेनॉल खाली नमूद केलेल्या सरकारी उपक्रमातील तेल कंपनीच्या डेपोमध्ये एक मार्गे अंदाजे २८,५८,००० लाख लिटर्स पोहोच करण्यासाठी गुरूवार दिनांक ५/१२/२०२४ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सक्षम इच्छुक वाहतूक ठेकेदारांनी प्रति हजार लिटर्स इथेनॉल वाहतूकीचा दर(जीएसटी विरहीत) नमूद करून आपल्या सिलबंद निविदा कारखाना मुख्य कार्यालयात पोहोच कराव्यात. निविदेसोबत टेंडर बयाणा रक्कम रूपये ५.०० लाख डी डी अथवा आरटीजीएस ने भरावयाचे आहेत. निविदेसोबत टेंडर बयाणा रक्कम न भरल्यास निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.

| अ.नं. | राज्य | तेल कंपनी वाहतुकीचे ठिकाण | क्वॉटीटी लिटर | वाहतूक अंतर अंदाजे किमीमध्ये | इथेनॉल पोहोच करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | कर्नाटक/हुबळी | HPCL | १२,२९,००० | २७२ | जानेवारी, २०२५ |
| २. | कर्नाटक/हुबळी | IOCL | १६,२९,००० | २७२ | जानेवारी, २०२५ |

इथेनॉल वाहतूकीसंबंधातील अटी व शर्ती कारखान्याच्या www.sahyadrisakhar.com या वेब साईटवर अथवा कारखाना मुख्य कार्यालयात, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

कोणतीही निविदा स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार कारखान्याने राखून ठेवलेला आहे.

आबासाहेब पाटील
कार्यकारी संचालक,
सह्याद्रि सहकारी साखर कारखाना लिमिटेड

स्थळ- यशवंतनगर
दिनांक- २६/११/२०२४

**सह्याद्रि सहकारी साखर कारखाना लि, यशवंतनगर,**
**ता.कराड, जि. सातारा.**

फोन नं. कारखाना- ८९५६०१५५०१ ते ०५, ई-मेल- sahyadrisugar@gmail.com

## :: इथेनॉल वाहतूक अटी व शर्ती ::

१.वाहतूक ठेकेदार यांचे स्वतःच्या मालकीचे टँकर असणे आवश्यक आहे. एक्सप्लोझीव्ह लायसेन्स व हजार्डस् केमीकल्स ॲक्टमधील तरतुदीनुसार परवाना आवश्यक आहे. तसेच इथेनॉल वाहतूकीसाठी वापरण्यात येणाया टँकरची संख्या व त्यांची क्षमता निविदेमध्ये नमूद करावी. तसेच प्रत्येक टँकरसोबत क्लिनर असणे बंधनकारक राहिल.

२. इथेनॉल टँकरची केबीन लाकडी असू नये. केबीन ओ आय एस डी १५७, ४.३.१ प्रमाणे असावी व राज्य उत्पादन शुल्क, रस्ते परिवहन, वजन मापे खात्याचे व ऑईल कंपन्यांचे नियम वाहतूक ठेकेदार यांचेवर बंधनकारक राहतील.

३. वाहतूक ठेकेदारांनी इथेनॉल वाहतूकीच्या कामासाठी वेळेवर आणि पुरेसे टँकर उपलब्ध केले नाहीत आणि त्यामुळे कारखान्यास वाहतूकीची पर्यायी व्यवस्था करावी लागली तर कारखान्यास त्यासाठी येणारा जादा वाहतूक खर्च वाहतूक ठेकेदारांच्या बिलातून वसूल केला जाईल.

४. इथेनॉल वाहतूकीचे काम कारखान्याच्या सुचनेप्रमाणे दिलेल्या मुदतीत पूर्ण करावयाचे आहे. सदर कामात कोणत्याही प्रकारे व्यत्यय, अडचण, तक्रार/खोळंबा यामुळे कारखान्याचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वाहतूक ठेकेदार यांची राहिल व सदर नुकसानीची रक्कम वाहतूक ठेकेदार यांचे बिलातून वसूल करण्यात येईल.

५. इथेनॉल वाहतूक करतेवेळी काही अपघात झाल्यास अगर इथेनॉलचे काही नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वाहतूक कंत्राटदार यांची राहिल, तेल कंपनीचे नांवावर त्या क्वांटीटीच्या संपूर्ण रकमेची भरपाई करून देण्याची जबाबदारी वाहतूक कंत्राटदार यांची राहील व नुकसानीची रक्कम वाहतूक ठेकेदार यांचे बिलातून वसूल करण्यात येईल. मात्र वाहतूकीतील क्वांटीटीच्या कारखान्याने उतरविलेल्या वाहतूकीतील नुकसानीच्या विम्याची मिळणारी सर्व रक्कम वाहतूक कंत्राटदारास दिली जाईल.

६. प्रत्येक टँकरसोबत क्लिनिंग सर्टीफिकेट सादर करणे बंधनकारक आहे.

७. कारखान्याने टँकरमध्ये भरून दिलेली इथेनॉलची क्वॉटीटी व क्वॉलिटी (डिलीव्हरी चलनावरील नोंदीप्रमाणे) सरकारी उपक्रमातील कारखान्याने दिलेल्या ऑईल डेपोपर्यंत पोहोच करण्याची जबाबदारी वाहतूक ठेकेदार यांची राहिल. ऑईल डेपोकडून मिळणाया पोहोच पावतीवर शॉर्टेज आल्यास त्याची होणारी किंमत वाहतूकीच्या देय बिलातून वसूल केली जाईल.

८. इथेनॉलच्या वाहतूक कराराची मुदत ऑर्डर दिल्यापासून माहे ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत राहिल. या कालावधीत कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही.

पान नं.२ ....

९. इथेनॉल डिलीव्हरीसाठी कारखान्याकडे टँकर पाठविताना त्यासोबत ड्रायव्हरचे नांव, दोन प्रतित अधिकारपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, फिटनेस सर्टीफिकेट, गुडस् परमिट, रोड परमिट, कॅलीब्रेशन सर्टीफिकेट, स्पार्क अरेस्टर सर्टीफिकेट व मेडीकल बॉक्स आवश्यक आहे.

१०. इथेनॉल वाहतूकीचे बील मालाची पोहोच व नियमाप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता पूर्ण केल्यानंतर प्रत्येक महिन्यास आदा केले जाईल. वाहतूक ठेकेदार यांच्या बिलामधून नियमाप्रमाणे सिक्युरिटी डिपॉझीट व इनकम टॅक्स वसूल केला जाईल. त्यासाठी पॅन नंबर असणे जरूरीचे आहे.

११. इथेनॉल टँकर लोडींग व अनलोडींगच्या ठिकाणी एक्साईज फॉरमॅलिटीज संबंधित राज्य सरकाचे परमिट, पोर्टल रजिस्ट्रेशन पूर्ण करण्याची जबाबदारी वाहतूक ठेकेदार यांची राहिल.

१२. इथेनॉल टँकर अनलोडींगच्या ठिकाणी टँकर खाली करण्यास वेळ लागल्यास डिटेंशन चार्जेस दिले जाणार नाही.

१३. प्रत्येक टँकरसोबत DCP, CO2 सिलेंडर, मेनस्वीच व बॅटरी कव्हर असणे आवश्यक आहे. तसेच इथेनॉल वाहतूकीबाबत ऑईल कंपनीच्या मार्गदर्शक सूचना डिस्टीलरी ऑफिसमध्ये पहावयास मिळतील. त्या आपलेवर बंधनकारक राहतील.

१४. वाहतूक कंत्राटदार यांना इथेनॉल वाहतूकीचा पुर्वानुभव असणे आवश्यक आहे.

१५. वरील सर्व बाबींचा अटी व शर्तीचा समावेश असलेला लेखी करार करून देणे बंधनकारक राहिल.

१६. कराराचे पुर्ततेसंबंधात कांही वाद-विवाद निर्माण झाल्यास वादाचे निवारण / नुकसान भरपाई यासाठी न्यायालयाचे कार्यक्षेत्र कराड, ता.कराड जि.सातारा कक्षेत येईल.

आबासाहेब पाटील
कार्यकारी संचालक,
सह्याद्रि सहकारी साखर कारखाना लिमिटेड

स्थळ- यशवंतनगर
दिनांक- २६/११/२०२४